Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ११/१०/२०२३

## दि.१०/१०/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ९८७ /२०२३ भा.द.वि.कलम ३८०,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | १०/१०/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा चे सुमारास तुळजाभवानी प्लाझा, फ्लॅट नं.२०२ व ३०४, ओंकार हार्डवेअर समोर, मंगलनगर, वाकड, पुणे. येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/१०/२०२३ वेळ १८/५७ वा |
| फिर्यादी | :- | प्रविण सुधीर गायकवाड, वय २६ वर्षे, धंदा- नोकरी, पत्ता- तुळजाभवानी प्लाझा, फ्लॅट नं.२०२, ओंकार हार्डवेअर समोर, मंगलनगर, वाकड, पुणे |
| आरोपी | :- | दोन अनोळखी इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांच्या मित्रांचे १,१९,०००/- रु किंमतीचे ८ मोबाईल फोन व १,०००/- रु किंमतीचे पॉकेट कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे राहते घराचा दरवाजा उघडा असतांना उघड्या दारावाटे आत प्रवेश करुन चोरी करुन घेवुन गेले आहेत म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | दाखल/तपासी पोउपनि जाधव ७५०७४५५२९४ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | एमआयडीसी भोसरी ४५३/२०२३ भा.दं.वि.कलम ३७९, ३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/१०/२०२३ रोजी दुपारी १२/०० वाचे सुमारास एस माहिपाल स्टील, जे-७, मसाला काटा, इंद्रायणी कॉर्नर जवळ, एमआयडीसी भोसरी पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि ११/१०/२०२३ रोजी ०१/३७ वा |
| फिर्यादी | :- | फजल अब्दुल जानी शेख वय ४१ वर्ष धंदा नोकरी रा. १०७६, न्युनाना पेठ, अकवाणी हाईटस ्तिसरा मजला, प्लॅट नंबर ५, पुणे |
| आरोपी | :- | १)उमेश सतिश भांडेकर वय ३१ वर्ष रा. सदगुरु नगर भोसरी पुणे मुळगाव मु. पो. पिंपळगाव लिंगी ता. वाशी जि धाराशिव २)सागर लक्ष्मण सिरसट वय ३२ वर्ष रा. बालाजी नगर भोसरी<br>आरोपी अटक नाही |
| तपशिल | :- | नमुद फिर्यादी हे एस माहिपाल स्टील, जे-७ कंपनीत सुपरवायझर असुन नमुद तारीख वेळी व ठिकाणी एस माहिपाल स्टील, जे-७, या कंपनी मध्ये आरोपी क्र १ याने एका पिकअप चालकाला ऑर्डर असल्याचे सांगुन एस माहिपाल स्टील कंपनीमध्ये पाठवुन वर ९०,६२४/- रु.किं. एम एस स्टील एकुण १२ नग असा माल फिर्यादीचे संमतीशिवाय, मुद्दाम लबाडीचे इरादयाने चोरुन नेवुन सदरचा माल आरोपी क्र २ याला दिला आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि पानसरे/ पोहवा दातार ९६२३४४११४८ |

०३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ७९७/२०२३ भा.द. वि. कलम ३७६(२) (एन), ५०६ बाल लैगिक अपराधापासून बालकाचे संरक्षण अधिनियम ३, ४, ७, ८ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २१/०५/२०२३ रोजी रात्री ११.०० वा राणूबाईमळा, प्रेरणा कंपनी जवळ, चाकण, ता.खेड, जि. पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/१०/२०२३ रोजी २१/५३ वा |
| फिर्यादी | :- | पुरुष फिर्यादी वय ४३ वर्ष |
| आरोपी | :- | रंजित साथ करा वय २३ वर्षे राणूबाईमळा प्रेरणा कंपनी जवळ, चाकण, ता. खेड, जि. पुणे मुळ रा. पोटकोसेमर, पोस्ट, कुंजारा, जि. जयपुर, राज्य छत्तीसगड<br>**आरोपी ताब्यात आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे शेजारी राहणारा नमुद आरोपी याने फिर्यादीची मुलगी वय १६ वर्षे ६ महिने १३ दिवस हि अल्पवयीन आहे हे माहित असतान तीला लग्नाचे अमीष दाखवुन, तिला त्याचे रहाते घरात घेवुन जावुन तिचे इच्छे विरुध्द वेळोवेळी शारीरीक संबंध ठेवून तील १२ आठवडयाची गर्भवती केले आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि डेरे ८८८८८४०८० |

०४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चिखली ६६१/२०२३ भादवि कलम ३३८, २८७, १७६, १९३,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १२/०९/२०२३ रोजी रात्रौ १२/०० वा चे सुमारास व पुर्वी मे. श्री.मेहर ॲटोपार्ट इंडस्ट्रीज पवारवस्ती चिखली पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/१०/२०२३ रोजी १३/१६ वाजता. |
| फिर्यादी | :- | रविंद्र बाबुराम जयस्वाल वय २० वर्षे, धंदा- नोकरी रा. सी/ओ पप्पु पवार यांचे रुममध्ये, कोहिनुर वजन काटयाजवळ पवार वस्ती चिखली पुणे |
| आरोपी | :- | १)श्री.मेहर ॲटोपार्ट इंडस्ट्रीज पवार वस्ती चिखली पुणे चे मालक दिपक तिवारी, २)मॅनेजर प्रेमसिंग ३)सुपरवायझर परवेज व ४) विध्य ग्रेस हॉस्पीटलचे डॉक्टर (पुर्ण नाव पत्ते माहित नाहीत) **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी आप आपसात संगणमत करुन आरोपी क्र १ ते ३ यांनी फिर्यादीस प्रेस मशीन ऑपरेटींगचे कोणतेही ज्ञान नसताना सुरक्षाविषयक साधने व सुविधा न देता त्यांना हायड्रोलिक मशीन चालविण्यास सांगितल्याने फिर्यादी मशीवर काम करीत असताना प्रेस मशीनचे डाय फिर्यादीचे उजव्या हातावर पडुन त्यात उजव्या हातास गंभीर दुखापत होवुन त्यांची तीन बोटे कापली गेली आहेत. सदर अपघातास आरोपी क्र १ ते ३ हे कारणाभुत असुन फिर्यादी उपचार घेत असलेले विध्य ग्रेस हॉस्पीटल चे डॉक्टर यांनी झालेले अपघाताबाबत स्थानिक पोलीस ठाणेस माहिती देणे आवश्यक असताना तसेच एमएलसी करणे गरजेचे असताना तसे न करता उपचाराची कागदपत्र बदलुन मालकास मदत केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि न्यामणे ९९२३४५५१११ |

०५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ७९२/२०२३ भा.द.वि.कलम २७९,३३७, ३३८,४२७, मो वा का क १८४, १३४(अ) (ब) /१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०९/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०८.३०वा चे सुमारास आळंदी फाटा पुणे नाषिक रोडवर मुटकेवाडी फाटा,इंडियण ऑइल पंपाजवळ चाकण |
| गुन्हा दाखल | :- | दि.१०/१०/२०२३ रोजी ०३.०० वा |
| फिर्यादी | :- | प्रमोद विठठल मोरे वय २१ वर्शे रा आसखेड बु. पो. कुरकुडी ता खेड जि पुणे |
| आरोपी | :- | अफसार फरीद खान वय २२ वर्शे रा बरदोड ता रामघर जि अलवार राज्य राजस्थान **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्यांचा मित्र हे मो सा नं एम एच १४ जे जी ८८९७ वरुन जात असताना पाठीमागुन येणारे ट्रक क्र आर जे १४ जीएन १८०७ यावरिल चालक आरोपी याने त्याचे ताब्यातील भरधाव वेगात चालवुन, वाहतूकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून फिर्यादी व त्यांचा मित्र सौरभ यांचे गंभीर दुखापतीस कारणीभुत होउन अपघात करून अपघाताची खबर न देता पळून गेला म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/धोत्रे ९८६७३८५७८८ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ७९८/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, २८५, जिवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ३, ७ सह पुरवठा व वितरण नियमन) आदेश २००० चे कलम ३, ४, ५, ६, ७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १०/१०/२०२३ रोजी १९.१५ वा चे सुमा चाकण झिजाईमळा, आंबेठाण रोड, चौधरी दाबाचे समोर आण्णा बुरडे यांचे मालकीचे माळा/ दुकानामध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि १०/१०/२०२३ रोजी २३/४५ वा |
| फिर्यादी | :- | दत्ता नामदेव पाषाणकर पोलीस नाईक ब. नं. १८८३, नेमणुक चाकण पोलीसस्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय |
| आरोपी | :- | ज्ञानेश्वर ममता हुलवळे वय ६८ वर्षे, रा. चाकण, ऐश्वर्या, आंगण, फलॅट नं. १६. आंबेठाण रोड, झिजाईमळा, ता. खेड, जि. पुणे **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी याने गॅसने भरलेल्या गॅस सिलेंडर टाक्या घेवुन लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल हे माहीत असुन सुध्दा मानवी जिवीतास पोहचविणा-या कोणत्याही संभाव्य धोक्या पासुन सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे गरजेचे असताना ज्वाला ग्राही पदार्थाबाबत पुरेसा इतका बंदोबस्त करण्याचे पुर्वक टाळुन त्याचे ताब्यातील घरगुती व कमर्शियल भरलेल्या गॅस सिलेंडर मधुन घरगुती मोकळ्या सिलेंडर टाक्यांमध्ये भरत असताना मिळुन आला त्याने गॅस या जिवनावश्यक वस्तु शासन व ग्राहकांची फसवणुक केली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मडके ९८५०२२९३१६ |